(129)

५/३

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
मनुष्यबळ विभाग, २रा मजला,
प्रकाशगड, वांद्रे (पू), मुंबई.
संदर्भ क्र. कामगार/अ/२२८९८
दिनांक : ३०-७-२००४

## परिपत्रक

विषय : कंत्राटी कामगारांच्या वेतनाबाबत.
****************

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील कंत्राटी कामगारांचे वेतन, कामगार आयुक्त, मुंबई यांच्या वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रकाप्रमाणे दि.३१.१२.१९९६ पर्यंत निर्धारित करण्यात येत होते. यानंतर १९९७ पासून महाराष्ट्र शासनाने त्यांचे शासकीय अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. किवेअ-६६९७/७०७०/कामगार-७ दि.०६.१२.१९९६ अन्वये वेतन निश्चित केले होते. महाराष्ट्र शासनाने सदरहू किमान वेतन दराचे पुनर्विलोकन करून त्यांच्या शासकीय अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार क्र. किवेअ-१०२००२/८८/कामगार-७ दि.३०.०६.२००४ पासून उक्त रोजगारात नोकरीस असलेल्या या सोबत जोडलेल्या अनुसूचिच्या स्तंभ दोन मध्ये नमूद केलेल्या कामगारांच्या वर्गाला त्या अनुसूचिच्या स्तंभ ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निश्चित केले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

त्या अन्वये कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८चा ११) यांचे कलम २, च्या पोटकलम (म) अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे अथवा कलम ८५च्या पोटकलम (२)च्या अंतर्गत कोणत्याही कारखान्यातील रोजगारात परंतु महाराष्ट्र राज्यातील अनुसूचीमधील इतर कोणत्याही नोंदीमध्ये न मोडणाऱ्या रोजगारात कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी निश्चित केलेले वेतन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या जनित्र केंद्रातील कंत्राटी कामगारांना देय राहतील.

त्यास अनुसरून संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वरील अधिसूचनेमध्ये निर्देशित केलेल्या कंत्राटी कामगारांच्या किमान वेतन दराची अंमलबजावणी निर्देशित दिनांकापासून म्हणजेच दि.३०.०६.२००४ करावी व त्याप्रमाणे आपला अहवाल मुख्य कार्यालयास सादर करावा.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत : १) सर्व क्षेत्रिय अधिकारी/कार्यकारी अभियंता/पर्यवेक्षक व भांडार अधिकारी
२) उप मुख्य औ.सं.अधिकारी/औद्योगिक संबंध अधिकारी/कल्याण अधिकारी/कामगार अधिकारी